# साय-फाय महोत्सव शनिवारी

**पुणे :** विश्वकर्मा विद्यापीठ, क्विक हील आणि महाराष्ट्र सायबर पोलिसांतर्फे 'साय-फाय कलामहोत्सव' आयोजिला आहे. पुण्यात विश्वकर्मा विद्यापीठाच्या आवारात शनिवारी (ता. १६) हा महोत्सव होणार आहे. चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेचे माजी अधिष्ठाता प्रा. समर नखाते हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. "सायबर सुरक्षेसाठी आणि युवकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी हा महोत्सव आहे. सायबरविश्वातील मनुष्यजीवन या संकल्पनेवर लघुपट, भित्तिपत्रके, कथाकथन आणि निबंध आदी स्पर्धांचे आयोजन केले असून, देशभरातील कलाकार यामध्ये सहभागी होणार आहेत," असे 'विश्वकर्मा'चे कुलगुरू डॉ. सिद्धार्थ जबडे यांनी सांगितले. डिजिटल साक्षरतेतून भारताला सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी हा महोत्सव महत्त्वाचा असल्याचे 'क्विक हील'चे व्यवस्थापकीय संचालक कैलास काटकर यांनी सांगितले.